26-03-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/25/2025 11:26 PM Page 1




साखळी येथील पुलावर धोकादायक खड्डा
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



दिल्लीचा थरारक सामन्यात लखनौवर विजय
पान ४ वर

वेर्णा, बुधवार, २६ मार्च २०२५ I पाने ४ I ₹ ४

I REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 I Volume 13, Issue 203 I Verna, I facebook.com/dainikherald, Wednesday 26 March 2025 I Pages 4 I ₹ 4

# अद्यापही १८०० मुंडकार प्रकरणे प्रलंबित

## मुंडकारांना पाणी, वीज, शौचालय नाकारल्यास कारवाई मुख्यमंत्री

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २५ : जमीन मालकांनी मुंडकारांना पाणी, वीज जोडणी अथवा शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्यास नकार दिल्यास त्यांनी तातडीने पोलिसांत तक्रार दाखल करावी, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी मंगळवारी दिला.**

मयेचे आमदार प्रेमेंद्र शेट यांनी विधानसभेत मुंडकारांच्या संरक्षणासंदर्भात उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री सावंत म्हणाले की, या मूलभूत सुविधांसाठी कोणत्याही स्वतंत्र एनओसीची आवश्यकता नाही. त्यामुळे जमीन मालकांनी मुंडकारांना पाणी व वीज जोडणी घेण्यास किंवा त्यांच्या घराजवळ शौचालय बांधण्यास अडथळा निर्माण करू नये. तसेच, मुंडकारी हक्कांचे अंतिम निर्णय होण्यापूर्वीच त्यांना या सुविधांचा अधिकार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री सावंत यांनी पुढे सांगितले की, मुंडकारांना त्यांच्या घरांचे नूतनीकरण व पुनर्बांधणीसाठीच परवानगी मिळणार आहे. आमदार प्रेमेंद्र शेट यांनी मुंडकारांना भेडसावणाऱ्या अडचणींवर प्रकाश टाकत, प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि अडचणी कमी करण्याच्या दृष्टीने गोवा मुंडकार कायदा, १९७५ मध्ये सुधारणा करण्याची मागणी केली. महसूल मंत्री बाबूश मोन्सेरात यांनी स्पष्ट केले की, गोवा मुंडकरी कायदा हा मुंडकारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठीच आहे. या कायद्यामुळे मुंडकारांना त्यांच्या राहत्या घरातून बेदखल होण्यापासून संरक्षण मिळते तसेच त्यांना घरे खरेदी करण्याचा अधिकारही आहे. मागील तीन वर्षांत २,५०० प्रकरणांपैकी २,३०० प्रकरणे निकाली काढण्यात आली असून सध्या १,८०० प्रकरणे प्रलंबित असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार शेट यांनी जमीन मालक आणि मुंडकार यांच्यातील वादांमुळे अनेक मुंडकारांना मूलभूत सुविधा मिळण्यात अडथळे येत असल्याचे निदर्शनास आणले. त्यामुळे, पाणी, वीज जोडणी आणि शौचालय सुविधांपासून वंचित राहणाऱ्या मुंडकारांना दिलासा देण्यासाठी तसेच प्रलंबित प्रकरणांची सोडवणूक गतीने करण्यासाठी सरकारने त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

मुख्यमंत्री सावंत यांनी विधानसभेत सांगितले की, भाटकारांनी मुंडकारांची वीज आणि पाणी जोडणी तोडल्यास त्यांनी तात्काळ पोलिसांत तक्रार करावी. अशा प्रकरणांवर तातडीने कारवाई केली जाईल. त्यांनी स्पष्ट केले की, मुंडकार खटले सुरू असले तरीही वीज व पाणी जोडणी तोडण्याचा अधिकार कोणालाही नाही.

दरम्यान, कॅसिनो नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना नोटिसा पाठवण्यात आल्या असून कोणालाही सूट दिली जाणार नाही, असेही मुख्यमंत्री म्हणाले. महसूल न्यायालयात २०२२ पूर्वी २,५०० प्रकरणे दाखल झाली होती, त्यापैकी २,३०० प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. त्यानंतर १,८०० नवीन दावे नोंदविण्यात आले असून त्यांची सोडवणूक प्रक्रियेत आहे, अशी माहिती महसूल मंत्री मोन्सेरात यांनी दिली. सनसेट अट रद्द केल्यामुळे दावे दाखल करण्याचे प्रमाण घटल्याचे त्यांनी नमूद केले.

मुंडकारी प्रकरणे निकाली काढण्यासाठी अतिरिक्त उपजिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असली तरीही काही प्रकरणे प्रलंबित असल्याने मुख्यमंत्री सावंत यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घ्यावी, अशी मागणी आमदार विजय सरदेसाई यांनी केली.

# थकबाकीदार कॅसिनोंवर सरकार मेहरबान ?

▸ २४० कोटींच्या वसुलीचे काय ? : विरोधी पक्षांचा घणाघात



■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५ :** राज्यातील कॅसिनो ऑपरेटरांकडून थकबाकी वसुलीसंदर्भात विधानसभेत मंगळवारी जोरदार चर्चा झाली. विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी सरकारवर टीका करत ३५० कोटी रुपयांच्या थकबाकीपैकी २४० कोटी रुपये का वसूल झाले नाहीत, असा सवाल उपस्थित केला. त्यातील १०० कोटी रुपये न्यायप्रविष्ट असल्याची माहिती देत, जमिनीवरील काही कॅसिनोमध्ये अद्याप बेकायदेशीर लाईव्ह जुगार सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला.

आलेमाव यांनी विधानसभेत सरकारच्या नियामक भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, कॅसिनोवर देखरेख व नियंत्रणासाठी पूर्णवेळ गेमिंग आयुक्ताची नियुक्ती झाली आहे का? की जीएसटी आयुक्तच ही जबाबदारी सांभाळत आहेत? याची माहिती मागितली. त्यांनी असेही स्पष्ट केले की, १५ ऑनशोअर कॅसिनोपैकी काहींमध्ये बेकायदेशीर लाईव्ह जुगार सुरू असून, चार ऑपरेटर कायदेशीर कारवाईला सामोरे जात आहेत.

यावर उत्तर देताना मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी स्पष्ट केले की, सरकारने कधीही लाईव्ह गेमिंगला परवानगी दिली नाही. आतापर्यंत बेकायदेशीर गेमिंग प्रकरणांपैकी दोन निकाली निघाली आहेत, तर एक प्रकरण प्रलंबित आहे. सरकार वेळोवेळी कॅसिनो तपासणी करत असल्याचे सांगत, परवान्याच्या अटींचे उल्लंघन आढळल्यास संबंधित कॅसिनोचा परवाना निलंबित केला जाईल, असे स्पष्टीकरण मुख्यमंत्र्यांनी दिले . जीएसटी आयुक्तच सध्या गेमिंग आयुक्त म्हणूनही कार्यरत असल्याची माहिती त्यांनी विधानसभेत दिली. मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले की, ३१ मार्च २०२५ पर्यंत २५० कोटी रुपये कॅसिनो ऑपरेटरांकडून वसूल केले जातील, तर १०० कोटी रुपये न्यायालयीन प्रकरणांनंतर तीन महिन्यांत मिळवण्याचा सरकारचा मानस आहे.

## निवडक

### दंतेवाडा चकमकीत ५ नक्षलवादी ठार

छत्तीसगड, दि. २५ : छत्तीसगडमधील दंतेवाडा-बिजापूर-नारायणपूर जिल्ह्याच्या सीमेवर पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत ५ नक्षलवादी ठार झाले आहेत. ३ मृतदेहांसह इन्सास रायफल्स जप्त करण्यात आल्या आहेत. नक्षलवाद्यांच्या मोठ्या संख्येच्या उपस्थितीच्या माहितीच्या आधारे, सुमारे ५०० जवानांनी कोर क्षेत्रात प्रवेश केला. इंद्रावती नदीच्या पलीकडे मोठ्या संख्येने नक्षलवादी जमल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या आधारावर, कारवाईसाठी एक दिवस आधीच दंतेवाडा आणि विजापूरमधून सैनिकांना बाहेर काढण्यात आले. सैन्याने नक्षलवाद्यांना घेरले आहे. दंतेवाडाचे एसपी गौरव राय आणि एएसपी आरके बर्मन म्हणतात की चकमक सुरू आहे.

---

### अजय सेठ नवे वित्त सचिव

नवी दिल्ली, दि. २५ : भारताचे नवे वित्त सचिव म्हणून कर्नाटक केडरचे १९८७ च्या बॅचचे आयएएस अधिकारी अजय सेठ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते आर्थिक व्यवहार विभागात सचिव म्हणून काम करत होते. वित्त सचिव म्हणून कार्यरत असलेले तुहिन कांता पांडे यांची सेबीच्या अध्यक्षपदी बढती झाल्यानंतर अजय सेठ यांची नवीन वित्त सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सेठ एक अनुभवी प्रशासक आहेत. त्यांना वित्त, सार्वजनिक धोरण आणि प्रशासनातील चांगला अनुभव आहे. त्यांनी हार्वर्ड विद्यापीठातून सार्वजनिक प्रशासनात पदव्युत्तर पदवी तसेच भौतिकशास्त्र आणि व्यवसाय प्रशासनात पदव्या घेतल्या आहेत.

---

### ऑनलाईन गेमिंगच्या ३५७ वेबसाईट बंद

नवी दिल्ली, दि. २५ : देशात बेकायदेशीर चालणाऱ्या ऑनलाईन गेमिंग कंपन्यांवर केंद्र सरकारने मोठी कारवाई केली आहे. परदेशातून कार्यरत असलेल्या ऑनलाईन गेमिंगच्या ३५७ वेबसाईट ब्लॉक करण्यात आल्या आहेत. तसेच जवळपास २ हजार ४०० बँक खातीसुद्धा गोठवण्यात आली असून जप्त करण्यात आली आहेत. बॉलीवूड सेलिब्रिटी, प्रसिद्ध खेळाडू आणि सोशल मीडिया इन्फ्लूएन्सरनी अशा प्लॅटफॉर्म्सची जाहिरात केली तरी लोकांनी यावर विश्वास ठेवू नये, याला बळी पडू नये, असे आवाहन अर्थ मंत्रालयाने केले आहे. सध्या ७०० हून अधिक ई-गेमिंग कंपन्या डीजीजीआयच्या रडारवर आहेत. या कंपन्यांनी कोणत्याही प्रकारची नोंदणी केली नाही. तसेच या कंपन्या जीएसटीची चोरी करत आहेत.

---

### दुसऱ्या बँकेचे एटीएम वापरणे महागणार

नवी दिल्ली, दि. २५ : आपल्या बँकेचे एटीएम सोडून दुसऱ्या बँकेच्या एटीएमधून पैसे काढणे किंवा विविध व्यवहार करणे आता महागणार आहे. कारण आरबीआयने इंटरचेंज शुल्क वाढवण्यास मंजुरी दिली आहे. ही वाढ १ मे २०२५ पासून लागू होणार आहे. आरबीआयने आर्थिक व्यवहारांसाठी १ रुपये शुल्क वाढवले असून एटीएमसंबंधी पायाभूत सुविधा मर्यादित असल्याने त्याचा सर्वाधिक परिणाम लहान बँकांवर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे याचा अधिकचा भार ग्राहकांवर पडण्याची शक्यता आहे. गेल्या १० वर्षांत जेव्हा इंटरचेंज शुल्क वाढवण्यात आले आहे, तेव्हा बँकांनी नेहमीच बदल ग्राहकांवर ढकलले आहेत.

### हवामान

कमाल : ३८ किमान : २६
आर्द्रता : ५९

### बाजार भाव

सोने : ₹ ९०,५८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹१,०१,००० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७८,०१७.७७ ↑ (३१.१६ )
निफ्टी : २३,६६८.४० ↑ (४३.९५)

# राज्यपालांच्या अभिभाषणावर विरोधी पक्षाचा आक्षेप

■ टीम दैनिक हेराल्ड

▸ सामाजिक आणि आर्थिक मुद्द्यांना उचित स्थान न दिल्याचा आरोप

**पर्वरी, दि. २५ :** राज्यपालांच्या अभिभाषणात महत्त्वाच्या सामाजिक आणि आर्थिक मुद्द्यांना उचित स्थान न दिल्याचा आरोप विरोधी पक्षाच्या आमदारांनी केला आहे. शालेय शिक्षणाच्या उन्नतीसाठी आवश्यक उपाययोजना तसेच राज्यातील बिघडलेल्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नांवर अभिभाषणात कोणताही उल्लेख नसल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली.

राज्यपालांच्या भाषणादरम्यान बाणावलीचे आमदार वेंझी व्हिएगस यांनी सरकारच्या विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सरकारने गोव्याच्या विकासाबाबत गाजावाजा केला असला तरी निश्चित उद्दिष्टे ठरविण्यात अपयश आले आहे. गेल्या तीन वर्षांत आपण विकसित गोवा पाहिला आहे का? सरकारने रोजगाराचे कोणतेही स्पष्ट लक्ष्य ठेवले आहे का? युवकांना सरकारी नोकऱ्या देण्याच्या आश्वासनांचे काय झाले? असा सवाल त्यांनी केला.

व्हिएगस यांनी राज्यातील अनुदानित शाळांची स्थिती आणि त्यांच्या कार्यक्षमतेबाबतही प्रश्न उपस्थित केला. उन्हाळ्यात शाळा चालवण्यासाठी त्या योग्य आहेत का? एका विद्यार्थ्याने वर्षभरात २२० दिवस आणि १,०६५ तास शाळेत घालवण्याची आवश्यकता असते, अशा परिस्थितीत मुलांनी शाळेत आणखी किती तास घालवावे लागतील ? असा मुद्दा त्यांनी मांडला.

राज्याच्या आर्थिक स्थितीबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली. २०२३ मध्ये जीएसडीपी ३.५ टक्के होता, जो २०२४ मध्ये ४.२ टक्क्यापर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. मात्र, सरकार दीर्घकालीन आर्थिक विकासावर भर देत नाही,असाही आरोप व्हिएगस यांनी केला.

केपेचे आमदार अल्टोन डिकॉस्टा यांनीही प्रशासनाच्या कारभारावर टीका केली. शासनाच्या विविध योजनांचे लाभ लाभार्थ्यांना वेळेवर मिळत नाहीत. नागरिकांना भत्त्यांसाठी वाट पाहावी लागत आहे. स्वयंपूर्ण मित्रांनी कधीही माझ्याशी संपर्क साधलेला नाही. प्रशासन शेवटच्या नागरिकाच्या विकासाचा दावा करत असले तरी प्रत्यक्षात ते अपयशी ठरले आहे, असे ते म्हणाले.

डिकॉस्टा यांनी आरोग्य सेवांबाबतही नाराजी व्यक्त केली. माझ्या मतदारसंघातील आरोग्य विभागात मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये कर्मचारी नसल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. पिसुर्ले येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे उद्घाटन अद्याप झालेले नाही, यावरूनच प्रशासनाच्या कार्यक्षमतेचा अंदाज येतो, असा आरोप त्यांनी केला. विरोधी आमदारांनी सरकारला खडे बोल सुनावत, शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि कायदा-सुव्यवस्था या महत्त्वाच्या विषयांवर ठोस उपाययोजना राबवण्याची मागणी केली आहे.

# जुने गोवा तीर्थस्थळासाठी सुविधा विकासाला मंजुरी

■ टीम दैनिक हेराल्ड



**पर्वरी, दि. २५ :** पर्यटन विभागाने जुन्या गोव्यात यात्रेकरूंसाठी सुविधा आणि हरित वाहतूक प्रकल्प हाती घेतला असून, यासाठी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, राष्ट्रीय स्मारक प्राधिकरण, नगर नियोजन विभाग तसेच वन विभागाकडून आवश्यक परवानग्या प्राप्त करण्यात आल्या आहेत अशी माहिती पर्यटन मंत्री रोहन खंवटे यांनी मंगळवारी विधानसभेत दिली.

खंवटे यांनी आमदार राजेश फळदेसाई आणि वीरेश बोरकर यांच्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना सांगितले की, केंद्र सरकारने २०१४-१५ मध्ये सुरू केलेल्या तीर्थयात्रा पुनरुज्जीवन आणि आध्यात्मिक वृद्धिंगत मोहीम योजनेअंतर्गत हा प्रकल्प राबवण्यात येत आहे. यामध्ये धार्मिक स्थळांचा एकात्मिक विकास करून जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा उद्देश आहे.


याबद्दल अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की, डिसेंबर २०१९ मध्ये मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार देखरेख समितीसमोर हा प्रस्ताव मांडण्यात आला. या समितीत पुरातत्व विभाग , नगर नियोजन विभाग आणि जुने गोवा पंचायतीचे प्रतिनिधी सहभागी होते. २ मार्च २०२२ रोजी, संरक्षित स्थळ असल्याने कामाच्या प्रारंभिक व्याप्तीचे अधिकार पुरातत्व सर्वेक्षण विभागाकडे सोपवण्यात आले. पुरातत्व विभागाने ६ जानेवारी २०२३ रोजी सुधारित आराखडा सादर केला. १२ मे २०२३ रोजी राष्ट्रीय स्मारक प्राधिकरणाने प्रकल्पास मंजुरी दिली. ७ मार्च २०२४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे प्रकल्पाची पायाभरणी केली. ४ डिसेंबर २०२४ रोजी पर्यटन मंत्रालयाने १६.४६ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिली.

१६ जुलै २०२१ व २३ जुलै २०२३ रोजी आर्चडायोसेस, पुरातत्व सर्वेक्षण विभाग , टीसीपी आणि ओल्ड गोवा पंचायतीच्या प्रतिनिधींसोबत बैठका घेण्यात आल्या. ५ जून २०२३ रोजी, ओल्ड गोवा चर्च अधिकाऱ्यांसमोर, पुरातत्व सर्वेक्षण विभाग आणि इतर संबंधित विभागांच्या समोर प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. चर्च अधिकाऱ्यांच्या सूचनांचा विचार करून आवश्यक सुधारणा करण्यात आल्या.

मंत्री खंवटे यांनी स्पष्ट केले की, यात्रेकरूंना उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रकल्पामध्ये शौचालय ब्लॉक, माहिती केंद्र आणि रिफ्रेशमेंट झोन यांचा समावेश आहे. विशेषतः, दिव्यांग यात्रेकरूंसाठी सुलभता राखली जाणार आहे. या पान २ ▶

# खापरेश्वरनंतर आता सतीदेवी देवस्थानाचा प्रश्न पेटला !

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. २५ :** राष्ट्रीय महामार्ग विस्ताराच्या पार्श्वभूमीवर भोम येथे रस्त्याच्या रुंदीकरणासाठी करण्यात आलेल्या सर्वेक्षणानंतर स्थानिक नागरिकांमध्ये चिंता आणि नाराजी व्यक्त केली जात आहे. या सर्वेक्षणामध्ये सती देवी देवस्थानाचे क्षेत्र समाविष्ट केल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

भोमवासीयांनी यावेळी स्पष्ट शब्दांत सांगितले की, आम्ही आमचे रक्त सांडू, पण आमच्या देवतांना हात लावू देणार नाही. स्थानिक नेते संजय नाईक यांनी सरकारला इशारा देत सांगितले की, आमच्या श्रद्धास्थानांवर कुठलाही आघात आम्हाला मान्य नाही. सरकारने आमच्या सहनशक्तीची परीक्षा घेऊ नये. आम्ही आमच्या वारशाचे रक्षण करण्यासाठी कोणत्याही थराला जाऊ.

ग्रामस्थांच्या मते, रस्ता रुंदीकरणासाठी अन्य पर्याय उपलब्ध असतानाही सरकारने स्थानिकांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले आहे. भोम बायपास ही ग्रामस्थांची महत्त्वाची मागणी असून, ती सरकारने गांभीर्याने विचारात घ्यावी, अन्यथा अधिक तीव्र आंदोलन उभे राहील, असा इशारा देण्यात आला आहे.

गेल्या काही वर्षांत काही धार्मिक स्थळांचे स्थानांतरण किंवा विस्थापन करण्यात आल्याने स्थानिक नागरिकांच्या मनात भीती आहे. पर्वरी येथील खापरेश्वर मंदिर हटवण्याचा संदर्भ देत, ग्रामस्थांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केला. डबल इंजिन सरकार मंदिरांचे रक्षण करेल, असे सांगते, पण प्रत्यक्षात लोकभावनांचा विचार केला जात नाही,अशी टीका करण्यात आली आहे.

रविवार, २३ मार्च रोजी झालेल्या सर्वेक्षणानंतर स्थानिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. अधिकाऱ्यांनी हे पाईपलाइनसाठीचे सर्वेक्षण आहे असे सांगितले असले, तरी प्रत्यक्ष पाहणीदरम्यान रस्ता रुंदीकरणासाठीच सीमांकन होत असल्याचे ग्रामस्थांना जाणवले. यामध्ये सती देवी पेड़ आणि इतर पान २ ▶

# जांबावली गुलालमय...



**मडगाव : जांबावलीचा प्रसिद्ध गुलालोत्सव मंगळवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्री रामनाथ दामोदर देवाचा जयघोष आणि ढोलताशांचा गजर करीत मोठ्या संख्येने जमलेल्या भाविकांनी गुलालाची उधळण केली. (मोहीत खरंगटे)**